जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १७९ | सोमवार, १९ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### शिंदेसेना संपवण्याचे भाजपाचे प्रयत्न?

मुंबई, ता. १८ : एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला महाराष्ट्रातून संपवण्याचे भाजपाचे प्रयत्न असल्याचा दावा एमआयआमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केला. त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून तर्कवितर्क लावले जात आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर जलील यांनी माध्यमांशी संवाद साधला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला संपवण्याचे भाजपाचे लक्ष्य आहे. याच कारणामुळे त्यांनी ऐनवेळी महापालिका निवडणुकीत त्यांच्याशी युती केली नाही. भाजपा हा प्रयत्न यशस्वी झाला असून संभाजीनगरमध्ये शिवसेना आमच्याही मागे पडली आहे. शहरात एका पालकमंत्र्यासह शिंदे गटाचे सहा आमदार असतानाही जास्त नगरसेवक निवडून आले नाही. एमआयएमच्या बालेकिल्ल्यांमध्ये सभा घेऊन त्यांचा काहीच फायदा झाला नाही, असा टोला जलील यांनी लगावला आहे.

# पुण्याच्या पराभवानंतर पवार एकत्र

## बारामतीत उपमुख्यमंत्री अजित दादा व रोहित पवारांची गुप्त भेट

## जिल्हा परिषदेसाठी दोन्ही राष्ट्रवादी 'घड्याळ' चिन्हावरच लढणार?

**पुणे, ता. १८ :** राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांना अपेक्षित यश न मिळाल्यानंतर आता राष्ट्रवादीच्या राजकारणात मोठ्या हालचालींना वेग आला आहे. शरद पवार गट आणि अजित पवार गट या दोन्ही पक्षांमध्ये काहीतरी निर्णायक घडत असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. त्यामुळेच राज्याच्या राजकीय वर्तुळाचं लक्ष आता बारामतीकडे लागलं आहे.

महापालिका निवडणुकांमध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या बालेकिल्ल्यांमध्ये अजित पवारांनी पूर्ण ताकद पणाला लावली होती. मोफत मेट्रो, बससेवेच्या घोषणा, आक्रमक प्रचार, स्थानिक नेत्यांची फौज मैदानात उतरवूनही राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा फटका बसला. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढूनही भाजप-महायुतीसमोर फारसा प्रभाव पाडता आला नाही. यामुळे आता येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका राष्ट्रवादीसाठी प्रतिष्ठेची लढाई ठरणार आहेत.

याच पार्श्वभूमीवर काल सकाळपासून उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्यातील बारामती हॉस्टेलमध्ये तळ ठोकून आहेत. पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत ते बैठका घेत असून आगामी निवडणुकांची रणनीती आखत आहेत. या बैठकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार अचानक बारामती हॉस्टेलमध्ये दाखल झाले आणि त्यांनी अजित पवारांची भेट घेतली. ही भेट केवळ औपचारिक नसून त्यामागे मोठी राजकीय गणितं असल्याचं बोललं जात आहे. खरं तर या भेटीआधीच काल मोठ्या घडामोडी घडल्या होत्या. अजित पवार यांनी थेट शरद पवार यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली होती. त्यावेळी शरद पवार गटाचे आमदार आणि खासदार उपस्थित होते. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र कसे लढू शकतात, यावर चर्चा झाल्याची माहिती आहे.



मात्र, या भेटीनंतर अजित पवारांनी माध्यमांसमोर हा विषय टाळण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर संध्याकाळी सोलापूर जिल्ह्यातील खासदार आणि आमदार बारामतीत अजित पवारांना भेटायला पोहोचले. मोहोळ, माळशिरस आणि पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद गटांमधील तिढा सोडवण्यासाठी ही बैठक झाल्याचं सांगितलं जात आहे. या बैठकीला शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, आमदार नारायण आबा पाटील, आमदार अभिजीत पाटील तसेच अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील उपस्थित होते.

या सर्व बैठकींचा केंद्रबिंदू एकच आहे, आगामी ग्रामीण निवडणुका. महापालिकांमध्ये झालेल्या पराभवानंतर राष्ट्रवादीला ग्रामीण भागातही फटका बसू नये, यासाठी दोन्ही पक्ष एकत्र लढण्याची तयारी करत असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे या निवडणुका एकाच चिन्हावर लढवण्याचा प्रस्तावही चर्चेत आहे. तुतारी की घड्याळ, यावर एकमत होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागात मतदारांचा संभ्रम टाळण्यासाठी घड्याळ चिन्हावर लढण्यावर अजित पवार आग्रही असल्याचं समजतं. राष्ट्रवादी काँग्रेसचा जन्मच पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या राजकारणातून झाला आहे. त्यामुळे या निवडणुकांमध्ये अपयश म्हणजे पक्षाच्या मुळावर घाव ठरणार आहे. याच कारणामुळे शरद पवार आणि अजित पवार दोघेही ही लढाई अत्यंत गांभीर्याने घेत आहेत.

आज रोहित पवार आणि अजित पवार यांची झालेली भेट, काल शरद पवार यांच्याशी झालेली चर्चा आणि सोलापूरच्या नेत्यांची बारामतीत झालेली गर्दी, हे सगळे संकेत एकाच दिशेने जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काहीतरी मोठा निर्णय होण्याच्या उंबरठ्यावर आहे. तो निर्णय दोन्ही पक्षांना पुन्हा एकत्र आणणारा ठरेल की केवळ निवडणूक पुरतं गणित ठरेल, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. मात्र, एवढं नक्की की राष्ट्रवादीच्या राजकारणात सध्या शांतता नाही, तर हालचालींचं वादळ सुरू झालं आहे.

### चारचाकी असेल तर स्वस्त धान्य बंद होणार?

**पुणे, ता. १८ :** राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक स्वच्छ, पारदर्शक आणि गरजूंसाठी प्रभावी करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मिशन सुधार अंतर्गत शिधापत्रिकांची (रेशन कार्ड) कठोर डिजिटल पडताळणी सुरू करण्यात आली असून, अपात्र लाभार्थ्यांना योजनेबाहेर काढण्यात येणार आहे. अडीच एकरपेक्षा अधिक जमिनधारणा, चारचाकी वाहन मालकी किंवा उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांचे स्वस्त धान्य बंद केले जाणार आहे.

गेल्या काही वर्षांत अपात्र व्यक्तींनी रेशन योजनेचा लाभ घेतल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. मोठ्या प्रमाणावर जमीन, चांगले उत्पन्न आणि आलिशान जीवनशैली असूनही स्वस्त धान्य घेतले जात असल्यामुळे खऱ्या गरजू कुटुंबांचा हक्क डावलला जात होता. याच पार्श्वभूमीवर सरकारने आता डिजिटल डेटाच्या आधारे लाभार्थ्यांची छाननी करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यात ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतजमिनीचा सविस्तर डिजिटल डेटा तयार करण्यात आला आहे. या डेटाचा वापर करून अडीच एकरपेक्षा (१ हेक्टर) अधिक जमीन असलेले तसेच उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असलेले शिधापत्रिकाधारक ओळखले जाणार आहेत. अशा अपात्र लाभार्थ्यांचे रेशन तात्काळ बंद करण्यात येणार आहे.

# महापालिकेच्या निवडणूका संपताच नागपुरात आयकर छाप्यांचा भडिमार

## सुपारीच्या काळ्या व्यापाराचा भांडाफोड; कोट्यवधींचे मुंबई कनेक्शन उघड

**नागपूर, ता. १८ :** महापालिका निवडणुकीची रणधुमाळी संपताच नागपूर शहरात आयकर विभागाने मोठी कारवाई करत सुपारी व्यापारातील कथित काळ्या बाजाराचा पर्दाफाश केला आहे. शनिवारी पहाटे आयकर विभागाच्या पथकाने शहरातील तब्बल २० हून अधिक ठिकाणी एकाचवेळी छापे टाकत व्यापारी वर्तुळात खळबळ उडवून दिली.

नागपूर हे मध्य भारतातील सुपारी व्यापाराचे प्रमुख केंद्र मानले जाते. येथून विदर्भासह मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये मोठ्या प्रमाणावर सुपारीचा पुरवठा केला जातो. विशेषतः निकृष्ट व सडलेल्या सुपारीचा वापर मावा, तंबाखू व गुटखा निर्मितीसाठी होत असल्याचे




अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा काळा पैसा तयार होत असल्याचा संशय आयकर विभागाला होता.

या कारवाईदरम्यान सुपारी व्यापारात चर्चेत असलेले राजू अण्णा ऊर्फ राजेश शिनॉय, अलताफ कलीवाला, आसिफ कलीवाला, गनी कलीवाला तसेच काही ट्रान्सपोर्ट व्यावसायिक आयकर विभागाच्या रडारवर आले आहेत. शांतिनगर व कामठी रोड परिसरातील राजू अण्णा यांच्या निवासस्थानी झडती सुरू असून, कलीवाला बंधूंच्या कार्यालये व गोदामांमध्ये कागदपत्रांची तपासणी केली जात आहे. कळमना परिसर आणि मां उमिया इंडस्ट्रियल एरियातील सुपारी गोदामांमध्येही रोख व्यवहार, बिलिंग आणि मालसाठ्याची चौकशी सुरू आहे. इतवारी व जागनाथ बुधवारी परिसरातील सुपारी दुकानांवर आयकर पथक दाखल होताच व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. कारवाईदरम्यान एके-४७ शस्त्रधारी जवान, डॉग स्क्वॉड आणि कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबईतील सुपारी व्यापारी फारूक भाई यांच्याशी असलेल्या कथित आर्थिक व्यवहारांचा तपास करण्यासाठी ही व्यापक कारवाई करण्यात आली आहे. करचुकवेगिरी, बनावट बिलिंग आणि देशभर पसरलेल्या आर्थिक जाळ्याचा छडा लावण्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, आयकर विभागाकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नसून, तपास पूर्ण झाल्यानंतरच जप्ती व आर्थिक गैरव्यवहारांची नेमकी आकडेवारी समोर येणार आहे. मात्र या छाप्यांमुळे नागपूरमधील सुपारी व्यापाराचे काळे अर्थकारण उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# घड्याळ की तुतारी? मतदारांचा गोंधळ झाला; पराभवानंतर रुपाली चाकणकरांची कबुली

**पुणे, ता. १८ :** महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये अपेक्षेप्रमाणे यश मिळू शकले नाही. या निकालावर पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी पहिली सविस्तर आणि स्पष्ट प्रतिक्रिया देत पराभवाची कारणे मान्य केली आहेत. निवडणूक म्हणजे हार-जीत येतच असते. पुणेकरांनी दिलेला कौल आम्ही स्वीकारतो. आता आत्म परीक्षण करण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या.

पुणे महापालिका निवडणुकीदरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोफत मेट्रो आणि बससेवेची घोषणा केली होती. मात्र तरीही राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला पुण्यात केवळ २७




जागांवर समाधान मानावे लागले. ही कामगिरी मागील निवडणुकीच्या तुलनेत घसरणीची ठरली आहे. पिंपरी-चिंचवडमध्येही पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. पुणेकर सुज्ञ आहेत. लोकशाही प्रक्रियेचा सन्मान करणे महत्त्वाचे आहे. पक्ष या निकालाचा सखोल आढावा घेईल, असे चाकणकर यांनी स्पष्ट केले.

मतमोजणी दरम्यान राष्ट्रवादीच्या उमेदवार रुपाली ठोंबरे पाटील यांनी मतमोजणी केंद्रात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या घटनेवर प्रतिक्रिया देताना चाकणकर म्हणाल्या, आपण संविधान मानणारे लोक आहोत. काही आक्षेप असतील तर न्यायालयाचा मार्ग अवलंबला पाहिजे. गोंधळ घालणे योग्य नाही. ईव्हीएमबाबत कोणतीही अधिकृत तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले, मात्र काही ठिकाणी शाई पुसल्याच्या तक्रारी आल्याचे मान्य केले. या निवडणुकीतून एक महत्त्वाचा धडा मिळाल्याचे सांगत चाकणकर यांनी स्पष्ट कबुली दिली. घड्याळ आणि तुतारी अशी दोन वेगवेगळी चिन्हे असल्यामुळे अनेक मतदारांचा गोंधळ झाला. एकच चिन्ह असते तर निकाल वेगळा लागला असता, असे त्या म्हणाल्या. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन, एकाच चिन्हावर निवडणूक लढवण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे संकेतही त्यांनी दिले.

दरम्यान, पुणे व पिंपरी-चिंचवडमधील हा निकाल राष्ट्रवादीसाठी धोक्याची घंटा मानला जात असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नव्या रणनीतीची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### पारोडीत वडिलोपार्जित जमीन बळकावण्याचा प्रयत्न

**न्हावरे, ता. १८ :** शिरूर तालुक्यातील पारोडी येथील वडिलोपार्जित शेतजमीन बळकावण्यासाठी तब्बल सहा दशकांपूर्वीच्या एकत्रिकरण नोंदींमध्ये छेडछाड करून बनावट जबाब, खोट्या सह्या व शिक्के तयार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात १३ जणांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कथित कटात येळे कुटुंबातील काही सदस्यांसह उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, शिरूर येथील तीन कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. फिर्यादी पोपट गंगाराम येळे (रा. पारोडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गट नं. १६ ही जमीन त्यांच्या आजोबांच्या नावावर वैधरीत्या नोंदलेली असून अनेक वर्षांपासून सातबारा उताऱ्यावर त्यांचे नाव कायम आहे.

**इतिहासात काही दिवस असे असतात, जे केवळ दिनदर्शिकेवर नोंद म्हणून राहत नाहीत, तर समाजाची मानसिकता आणि राजकारणाची दिशा कायमची बदलून टाकतात. १६ जानेवारी २०२६ हा असाच एक दिवस महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. तब्बल तीन-चार वर्षांच्या कायदेशीर पेचप्रसंगानंतर, आरक्षणाच्या गुंतागुंतीतून आणि प्रशासकीय राजवटीच्या दीर्घ काळानंतर राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये झालेल्या निवडणुकांतून शहरी महाराष्ट्राने आपला स्पष्ट आणि ठाम कौल दिला आहे.**

# महाराष्ट्राच्या शहरी मनाचा कौल, भावनिक गुलामीला नकार, विकासाच्या भगव्या विचारांना स्वीकार : मल्हार पांडे

हा कौल केवळ नगरसेवक निवडण्यापुरता मर्यादित नाही. हा कौल म्हणजे जुन्या, जीर्ण आणि भावनिक राजकारणाला दिलेली निर्णायक तिलांजली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकासाभिमुख हिंदुत्वाला दिलेला ठाम पाठिंबा आहे.

प्रशासकीय राजवटीच्या काळात शहरांचे लोकप्रतिनिधित्व हरपले होते. साध्या नागरी सुविधांसाठीही नागरिकांना संघर्ष करावा लागत होता. या अस्वस्थतेतूनच शहरी मतदारांमध्ये एक प्रकारची लोकशाही भूक निर्माण झाली होती. ही भूक भावनिक घोषणांनी नव्हे, तर ठोस विकासाच्या आश्वासनांनीच शमू शकते, हे मतदारांनी या निकालातून स्पष्ट केले आहे.

या निवडणुकीचा सर्वात महत्त्वाचा आणि निर्णायक संदेश म्हणजे शरद पवारांच्या पाच दशकांच्या राजकारणाचा झालेला अधिकृत अस्त. गेली अनेक वर्षे महाराष्ट्राचे राजकारण जोडतोड, जातीय समीकरणे, सहकारी संस्थांचे जाळे आणि सत्तेचे केंद्रीकरण याभोवती फिरत होते. ग्रामीण भागात काही काळ प्रभावी ठरलेली ही पद्धत आजच्या आधुनिक, तंत्रज्ञानस्नेही आणि महत्त्वाकांक्षी शहरी महाराष्ट्राने पूर्णतः नाकारली आहे.

हा विजय स्थानिक प्रश्नांपुरता मर्यादित नसून विकसित भारत २०४७ या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेला महाराष्ट्राने दिलेली ठाम साथ आहे. शहरी मतदारांनी हे ओळखले आहे की केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समविचारी सरकार असेल, तरच विकासाचे डबल इंजिन प्रभावीपणे धावू शकते. मुंबईतील मेट्रो आणि कोस्टल रोड, पुण्याचा रिव्हरफ्रंट प्रकल्प, नागपूरचा लॉजिस्टिक हब या सर्व प्रकल्पांमागे केंद्राचा निधी आणि मोदींचे दीर्घकालीन व्हिजन आहे. मोदींची गॅरंटी आणि फडणवीसांचे नियोजन एकत्र आले, तरच शहरांचे भवितव्य बदलू शकते, हा विश्वास मतदारांनी व्यक्त केला आहे.

या निवडणुकीचे स्थानिक शिल्पकार म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व ठळकपणे समोर येते. प्रशासकीय पकड आणि राजकीय चातुर्य यांचा दुर्मिळ संगम त्यांच्या नेतृत्वात दिसतो. विरोधकांनी अस्मिता आणि मराठीपणा यांचा भावनिक मुद्दा उपस्थित केला, मात्र फडणवीसांनी त्याला शब्दांनी नव्हे, तर कामातून उत्तर दिले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील लढत सर्वाधिक लक्षवेधी ठरली. येथे भाजपची लढाई बाह्य विरोधकांपेक्षा मित्रपक्ष असलेल्या अजित पवार गटाशी होती. स्थानिक वर्चस्वासाठी अजित पवारांनी शरद पवार गटाशी केलेली उघड हातमिळवणी मतदारांच्या



नजरेतून सुटली नाही. या पार्श्वभूमीवर मुरलीधर मोहोळ यांच्या संयमी नेतृत्वासोबतच सामान्य कार्यकर्त्यांची जिद्द निर्णायक ठरली. दादा संस्कृती आणि जुने सहकार मॉडेल पुण्याच्या आधुनिक आयटी मॉडेलसमोर सपशेल अपयशी ठरले.

**ठाकरे बंधूंची युती : मतदारांचा स्पष्ट नकार**

या निवडणुकीतील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती. तीन दशकांच्या संघर्षानंतर सत्तेसाठी एकत्र आलेली ही युती मतदारांना नैसर्गिक वाटली नाही. भाजपला रोखण्यापुरती मर्यादित असलेली ही आघाडी मतदारांनी वैचारिक गोंधळ म्हणून फेटाळली.

**नव्या महाराष्ट्राचा प्रारंभ**

१६ जानेवारी २०१६ रोजी महाराष्ट्राने जुन्या नेतेगिरीला पूर्णविराम दिला आहे. हा विजय आधुनिक हिंदुत्वाचा, विकासाचा आणि नव्या विचारांचा आहे. देवेंद्र फडणवीसांचे नेतृत्व म्हणजे एका हातात लॅपटॉप आणि दुसऱ्या हातात परंपरेचा अभिमान असा समतोल साधणारे नेतृत्व आहे. हा विजय केवळ भाजपचा नाही. तो त्या प्रत्येक नागरिकाचा आहे, ज्याला महाराष्ट्र देशातच नव्हे, तर जागतिक पातळीवर नंबर वन पाहायचा आहे.

**लेखक : मल्हार पांडे**
(राजकीय विश्लेषक व कॉर्पोरेट स्ट्रॅटेजिस्ट)

## संक्षिप्त




### मुंबईच्या महापौरपदावर शिंदेंचा अडीच वर्षांसाठी दावा?

**मुंबई, ता. १८ :** यंदा मुंबई महानगरपालिकेत कोणत्याही परिस्थितीत आपलाच महापौर बसवायचा, असा ध्यास भाजपने मनी बाळगला आणि मुंबईच्या निवडणुकीत ८९ वॉर्ड जिंकून पक्ष या स्वप्नाच्या जवळही पोहोचला. एकनाथ शिंदे यांचे २९ नगरसेवक सोबत असल्याने मुंबई महानगरपालिकेवर शिवसेना-भाजपची सत्ता येणार, हे जवळपास निश्चित आहे. नेमक्या याचवेळी एकनाथ शिंदे यांनी भाजपची गरज ओळखून एक मोठा डाव टाकलाय. एकनाथ शिंदे यांच्याकडून मुंबईच्या महापौरपदाची मागणी केली जाऊ शकते, असं म्हटलं जातंय. यंदाचे वर्ष बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. त्यामुळे बाळासाहेबांची ही इच्छा पूर्ण करा आणि शिवसेनेला अडीच वर्ष महापौरपद द्या, अशी भावनिक साद एकनाथ शिंदे यांच्याकडून घातली जाऊ शकते. याशिवाय, स्थायी समितीचे अध्यक्षपद आणि सदस्य पदांवरही शिंदे सेनेकडून दावा केला जाऊ शकतो. तसे घडल्यास मुंबईच्या राजकारणात नवी रंगत निर्माण होऊ शकते.



### संजय राऊतांचा शिंदेंवर संताप

**मुंबई, ता. १८ :** एकनाथ शिंदे यांचा जयचंद झाला नसता, तर भाजपाच्या १०० पिढ्यांनाही मुंबई महापालिकेवर विजय मिळवला आला नसता, असा संताप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला. महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते. आमच्या हातात जर सत्ता आणि पैसा असता तर फडणवीसांना मुख्यमंत्रिपद आणि शिंदेंना उपमुख्यमंत्रिपद टिकवता येणार नाही. महापालिका निवडणुकीपूर्वी शिवसेनेचे (उबाठा) ६० माजी नगरसेवक फोडण्यात आले, त्यातले ९० टक्के या निवडणुकीत पराभूत झाले. आम्ही शिवसेना आणि मनसेने ७१ जागा जिंकल्या. मराठी माणूस आमच्यामागे ठामपणे उभा राहिला, असे राऊत म्हणाले. शिंदे यांचा जयचंद झाला नसता तर भाजपाच्या १०० पिढ्या उतरल्या असत्या तरीही मुंबईत महापालिकेवर भाजपाचा महापौर बसला नसता, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

# महानगरपालिका म्हणजे कमिशनचा धंदा नाही; विजयानंतर फडणवीसांचा नगरसेवकांना ‘सज्जड दम’

**पुणे, ता. १८ :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला मिळालेल्या ऐतिहासिक यशानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांना थेट शब्दांत इशारा दिला आहे. हा पुणेकरांनी दिलेला आतापर्यंतचा सर्वांत मोठा कौल आहे. पण पदासाठी वाद, गटबाजी किंवा चुकीच्या गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत. कोणी कितीही मोठा असला तरी महापालिकेत गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असा सज्जड दम त्यांनी दिला.

पुण्यातील सर्व नवनिर्वाचित भाजप नगरसेवकांच्या अभिनंदनासाठी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, शहराध्यक्ष धीरज घाटे तसेच भाजपचे आमदार आणि पदाधिकारी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, पुण्यात भाजपने इतिहास रचला आहे. गेल्या ३०३५ वर्षांत कुठल्याही पक्षाला इतकँ प्रचंड बहुमत मिळाल्याचं मी पाहिलेलं नाही. पुणेकरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या अजेंड्यावर विश्वासाची मोहोर उमटवली आहे. माध्यमांमध्ये लढत चुरशीची असल्याचं दाखवलं जात होतं, पण आपल्या कार्यकर्त्यांनी ती एकतर्फी केली.

या विजयाकडे केवळ राजकीय यश म्हणून न पाहता जबाबदारी म्हणून पाहण्याचा सल्ला देताना ते म्हणाले, इतकँ मोठं बहुमत मिळालं की आनंद होतो, पण त्याच वेळी जबाबदारीही प्रचंड वाढते. पुणेकरांनी



मोठ्या अपेक्षेने आपल्याला निवडून दिलं आहे. जर त्यांच्या विश्वासाला आपण पात्र ठरलो, तर पुढची २५ वर्षे आपल्याला कोणी हलवू शकणार नाही. पण जर आपण त्यांच्या अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत, तर हा विजय लाटेसारखा निघून जाईल.

महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, सभागृह नेते आणि विविध समिती त्यांच्या नियुक्त्यांबाबतही त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. पद कोणाला यावर्षी मिळेल, कोणाला पुढच्या वर्षी मिळेल, यापेक्षा पुणेकरांनी दिलेला बहुमताचा कौल महत्त्वाचा आहे. पदासाठी खेचाखेची झाली, तर पुणेकर आपल्याला माफ करणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला.

महापालिकेतील कारभाराबाबत त्यांनी थेट भाष्य केलं. महापालिका हा कमिशनचा धंदा नाही. हा आपला व्यवसाय नाही. सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनासाठी आपल्याला दिलेली जबाबदारी आहे. पारदर्शक आणि प्रामाणिक कारभार हीच आपली ओळख असली पाहिजे.

आनंदाच्या क्षणीच कडवट सत्य सांगणं योग्य असतं, असं सांगत फडणवीस म्हणाले, महापालिकेत उन्माद, अहंकार किंवा अपारदर्शकता मी सहन करणार नाही. जनतेने दिलेल्या बहुमतापेक्षा मोठा कोणी नाही. जर लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नसाल, तर त्या खुर्चीवर बसण्याचा आपल्याला अधिकार नाही. पुण्याच्या विकासाबाबत ठोस दिशादर्शन करत त्यांनी सांगितलं की, पुणेकरांना दिलेली आश्वासने पुढील दोन वर्षांत प्रत्यक्ष कामाच्या स्वरूपात दिसली पाहिजेत. राज्य सरकार आणि केंद्र सरकार पूर्णपणे आपल्या पाठीशी आहे. पुणे देशातील नंबर एक महापालिका झाली पाहिजे, यासाठी आपण सगळ्यांनी एकदिलाने काम केलं पाहिजे.

भाजपला मिळालेल्या या प्रचंड विजयामुळे पुण्याच्या राजकारणात नवा अध्याय सुरू झाला आहे. पण हा अध्याय विकासाचा ठरेल की वादाचा, हे आता नवनिर्वाचित नगरसेवकांच्या कामगिरीवर अवलंबून असणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला हा इशारा म्हणजे सत्तेबरोबरच जबाबदारीही तितकीच मोठी आहे, याची आठवण करून देणारा स्पष्ट संदेश आहे.

## अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघालेल्या गाडीचा अपघात; ५ जणांचा जागीच मृत्यू

**मोहोळ, ता. १८ :** पनवेल येथून अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघालेल्या चारचाकी गाडीचा झालेल्या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. पुणेसोलापूर महामार्गावर मोहोळ जवळील देवडी पाटी परिसरात शनिवारी रात्री साडे अकराच्या सुमारास हि घटना घडली आहे.

माला रवी साळवे (वय ४०, रा. पंचशील नगर झोपडपट्टी, सेक्टर १८, न्यू पनवेल), अर्चना तुकाराम भंडारे (वय ४७, रा. सेक्टर ७, खांदा कॉलनी, पनवेल वेस्ट), विशाल नरेंद्र भोसले (वय ४१, रा. आरबीआय एमएसओ, रूम नं. ८, रेल्वे कॉलनी, पनवेल स्टेशन जवळ), अमर पाटील (रा. खारघर) आणि आनंद माळी असे



अपघातात मृत्यू झालेल्या पाच जणांची नावे आहेत. तर ज्योती जयदास टाकले (रा. सेक्टर ७, पनवेल, जि. रायगड) असे जखमी झालेलल्या महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एरटीका कार (एम.एच.-४६ झेड ४५३६) चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडावर चारचाकी कार जोरात आदळल्याने हा अपघात झाला. अपघातग्रस्त कारमध्ये एकूण सहा प्रवासी (तीन पुरुष व तीन महिला) होते. हे सर्व प्रवासी एकमेकांचे मित्र असल्याची माहिती समोर आली आहे. जखमी महिलेला तात्काळ उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, मोहोळ येथे दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच मोहोळ पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अपघात अत्यंत भीषण असल्याने मृतदेह वाहनात अडकलेल्या अवस्थेत आढळून आले. सदर वाहन रस्त्यापासून अंदाजे १० ते १५ ुट अंतरावर झुडपांमध्ये अडकले होते. मोहोळ पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून अपघाताचे नेमके कारण तसेच मृत व जखमींची सविस्तर माहिती घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



## पराभव होताच काँग्रेसच्या नेत्याचा राजीनामा

**ठाणे, त. १८ :** ठाणे महापालिका निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी स्वीकारत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी तडकाफडकी आपल्या सर्व पदांचा राजीनामा दिला. इतक्यावरच न थांबता त्यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्त होण्याची घोषणाही केली. ठाणे महापालिका निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेचे ७५, भाजपचे २८, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे १२, अजित पवार यांच्या पक्षाचे नऊ, एमआयएम पाच आणि शिवसेना ठाकरे गटाचा एक नगरसेवक निवडून आला. त्याशिवाय एका जागेवर अपक्ष उमेदवाराने विजय मिळवला. काँग्रेस व मनसेला या निवडणुकीत भोपळाही फोडता आला नाही. विशेष म्हणजे, काँग्रेसचे ठाणे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण आणि मनसेचे ठाणे शहराध्यक्ष रविंद्र मोरे या दोघांचाही पराभव झाला. या पराभवाची जबाबदारी स्वीकारत चव्हाण यांनी आपल्या पदांचा राजीनामा देऊन सक्रिय राजकारणातून निवृत्तीची घोषणा केली आहे.

## येरवडा, हडपसर भागात अपघात ; दोघांचा मृत्यू

**पुणे, ता. १८ :** शहरात वेगवेगळ्या भागात झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. हडपसर आणि येरवडा भागात अपघाताच्या घटना घडल्या.

येरवड्यातील सादलबाबा दर्गा रस्त्यावर भरधाव टेम्पोने पदपथावर शिरल्याने एकाचा मृत्यू झाला. भरधाव टेम्पोने वाहनांना धडक दिली. या प्रकरणी टेम्पो चालकाला लक्ष्मीनगर पोलिसांनी अटक केली. सुशील निवृत्ती मोहिते (वय-४०, रा. चांदणी चौक, जयजवानगर, येरवडा) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी टेम्पो चालक आदम चाँद शेख (वय-६२, रा. लोहियानगर, महात्मा फुले पेठ) याला अटक करण्यात आली. याबाबत अक्रम सलीम मुलाणी (वय-२५, रा. कागदीपुरा, कसबा पेठ) याने लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार मुलाणी रिक्षाचालक आहे. १७ जानेवारी रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास रिक्षाचालक मुलाणी सादलबाबा दर्गा रस्त्यावरुन निघाला होता. त्या वेळी तेथून निघालेल्या भरधाव टेम्पोने रिक्षाला धडक दिली. त्यानंतर भरधाव टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने टेम्पो पदपथावर शिरला. तेथे थांबलेले सुशील मोहिते यांना धडक दिली, तसेच पदपथावरील दुचाकी वाहनांना धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या मोहिते यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. टेम्पो चालक शेख याला ताब्यात घेण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक जगताप तपास करत आहेत.

पुणे-सोलापूर रस्त्यावर मांजरी परिसरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. आदित्य बाळासाहेब शेळके (वय-२०, रा. महादेवनगर, मांजरी) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत शेळकेयाचा मित्र मनोहर अण्णा रणशिंग (वय-१९, रा. महादेवनगर, मांजरी) याने मांजरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.


या प्रकरणी खासगी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार रणशिंग याच्या दुचाकीतील पेट्रोल संपल्याने रणशिंग आणि मित्र शेळकेहे पेट्रोल पंपावर १७ जानेवारी रोजी सकाळी सहाच्या सुमारास निघाले होते. मांजरी परिसरातील पेट्रोल पंप बंद असल्याने दुचाकीस्वार शेळके याने दुचाकी ढकलली. त्या वेळी भरधाव वेगात निघालेल्या बसने दुचाकीला धडक दिली.

दरम्यान, अपघातात शेळके आणि सहप्रवासी रणशिंग हे जखमी झाले. गंभीर जखमी झालेल्या शेळके याचा रुग्णालयात मृत्यू झाला. अपघातानंतर पसार झालेल्या बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे तपास करत आहेत.

## विठ्ठल-रुक्मिणीचा २३ जानेवारीला शाही विवाह सोहळा; हजारो भाविकांची उपस्थिती अपेक्षित

**पंढरपूर, ता. १८ :** श्री क्षेत्र पंढरपूर येथे माघ शुद्ध १ ते ५ या कालावधीत श्री विठ्ठलरुक्मिणी मातेच्या शाही विवाह सोहळ्याची जय्यत तयारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आली आहे. वसंत पंचमी अर्थात २३ जानेवारी रोजी परंपरेनुसार हा विवाह सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री रुक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन १९ ते २२ जानेवारी या कालावधीत दररोज दुपारी ४ ते ६ या वेळेत करण्यात आले असून, या कथेचे निरूपण प्रख्यात श्रीमद्भागवताचार्य साध्वी अनुराधा



(दीदी) राजेंद्र शेटे यांच्या सुमधूर व रसाळ वाणीतून होणार आहे.

वसंत पंचमीच्या दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचा विवाह सोहळा विधिवत मंत्रोच्चारात पार पडणार आहे. पहाटे काकडआरतीवेळी श्री विठ्ठलास सोन्याच्या मुकुटाऐवजी पांढरे पागोटे परिधान करण्यात येणार असून, या दिवसापासून रंगपंचमीपर्यंत पांढरा पोशाख परिधान करण्याची परंपरा पाळली जाणार आहे. नित्यपूजेत श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेस गुलाल अर्पण केला जाणार असून, वसंत पंचमीच्या दिवशी श्री रुक्मिणी मातेस सकाळी विशेष पांढरा पोशाख परिधान करण्यात येतो. सकाळी ११ वाजता श्री विठ्ठलाची तुळशी पूजा होऊन विवाह स्थळी येण्याचे निमंत्रण देण्यात येणार आहे. त्यानंतर श्री रुक्मिणी मातेस पांढरा पोशाख व पारंपरिक अलंकार परिधान करून पाद्यपूजा, नैवेद्य व आरती करण्यात येईल. दुपारी १२ वाजता श्री विठ्ठल सभामंडपात श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या प्रतिकात्मक मूर्ती आणून विवाह विधी संपन्न होणार आहे.

विवाह सोहळ्यानंतर दुपारी ४ वाजता विठ्ठलरुक्मिणी मातेच्या प्रतिकात्मक मूर्तींची सवाद्य शोभायात्रा काढण्यात येणार असून, ती व्ही.आय.पी. गेट, संत नामदेव पायरी, महाद्वार पोलीस चौकी, कालिका देवी मंदिर, नाथ चौक आदी मार्गाने निघणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळकेयांनी दिली.

भाविकांच्या सोयीसाठी चौफाळा व महाद्वार पोलीस चौकी येथे एलईडी स्क्रीनद्वारे सोहळ्याचे थेट प्रक्षेपण तसेच विविध समाज माध्यमांवरून लाईव्ह प्रसारण करण्यात येणार आहे. वसंत पंचमीच्या दिवशी दुपारी १२ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत अन्नछत्र सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली.

## उजनी धरणातून शेतीसाठी कालव्यातून ५०० क्युसेकने पाणी सोडण्यास सुरुवात

**सोलापूर, ता. १८ :** सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातून आज सायंकाळी चार वाजता शेतीसाठी कालव्याद्वारे ५०० क्युसेकने पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे. टप्प्याटप्प्याने कालव्याचे पाणी वाढवले जाणार आहे. पाणीमागणी वाढल्यामुळे अखेर पाणी सोडण्यात आले आहे. रविवारी सोडलेले पाणी ४० दिवस सुरू राहणार आहे. उजनीमधून कालव्यात सोडलेल्या पाण्यामुळे या हंगामातील पिकांना जीवदान मिळणार आहे.

उजनीतून बोगद्यातून सोडण्यात आलेला विसर्ग आतापर्यंत १०० क्युसेक एवढा होता. त्यामध्ये आज दुपारी चार वाजल्यापासून वाढ करून तो ४०० क्युसेक करण्यात आला आहे. आतापर्यंत उजनी धरणातून बोगदा, दहिगाव उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडले होते. कालव्यातून पाणी सोडण्याचा निर्णय लांबणीवर गेला होता. त्यामुळे कालव्यावर अवलंबून



असणाऱ्या शेतकऱ्यांतून संताप व्यक्त केला जात असल्याने उजनी प्रशासनाला पाणी सोडणे भाग पडले.

रविवारी (ता. १८) दुपारी चार वाजल्यापासून मुख्य कालव्याद्वारे पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे. त्यात टप्प्याटप्प्याने वाढ करत उद्या रात्रीपर्यंत तो २८०० ते ३००० क्युसेक करण्यात येणार आहे. उजनी धरणात सध्या १०० टक्के पाणीसाठा आहे. सर्व बाबींचा विचार करून धरणातून शेतीसाठी पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे शेतकरी थोडासा सुखावला आहे. या पाण्यामुळे कालव्यालगतच्या विहिरी व विंधन विहिरींना पाणी वाढते. त्यामुळे हे पाणी बंद झाल्यावर याचा फायदा होणार आहे.


दरम्यान, आता उजनीत उपयुक्त पाणी ५३.५७ टीएमसी आहे. त्यात सध्या कालव्यात ५०० क्युसेकने पाणी चालू आहे. म्हणजेच कालवा बंद होईपर्यंत आणखी ६ ते ८ टीएमसी पाणी कमी होणार आहे. हे पाणी उन्हाळ्याच्या ४ महिने पुरविणे गरजेचे आहे. यात केवळ योग्य नियोजनानेच साध्य होऊ शकते.

## नवनीत राणांची पक्षातून हकालपट्टी करा; भाजपच्या उमेदवारांचं थेट मुख्यमंत्र्यांना पत्र

**अमरावती, ता. १८ :** अमरावती महापालिकेच्या निकाल जाहीर होताच शहरात सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या असतानाच भाजपच्या अंतर्गत राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. भाजपच्या तब्बल २२ पराभूत उमेदवारांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून माजी खासदार नवनीत राणा यांना पक्षातून तात्काळ निष्कासित करण्याची मागणी केली आहे. आमचा पराभव जनतेने नाही, तर नवनीत राणा यांनी गद्दारी करून केला, असा थेट आरोप या उमेदवारांनी केला आहे.

अमरावती: अमरावती महापालिकेच्या ८७ जागांपैकी भाजपने २५ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थान मिळवलं असलं, तरी बहुमतासाठी युवा स्वाभिमानी पक्षाच्या पाठिंब्याची गरज आहे. विशेष म्हणजे आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाने भाजपशी युती न करता स्वबळावर निवडणूक लढवली. यामुळे भाजपच्या अनेक उमेदवारांचा पराभव झाला असून, त्यामागे भाजपच्या नेत्या असलेल्या नवनीत राणा यांची भूमिका असल्याचा गंभीर आरोप आता समोर आला आहे.

पराभूत २२ उमेदवारांनी पाठवलेल्या पत्रात नवनीत राणा यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. भाजपमध्ये राहून भाजपाचाच काटा काढण्याचं काम नवनीत राणा यांनी केलं.



भाजपच्या बालेकिल्ला असलेल्या प्रभागांमध्ये त्यांनी स्वतःचे उमेदवार उभे केले. भाजपच्या पोस्टरवर स्वतःचा मोठा फोटो लावून प्रचार केला. शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या माध्यमातून संपूर्ण संघटना घरी बसवली. अधिकृत भाजप उमेदवारांची उमेदवारी मागे घेतल्याची पत्रं काढून त्यांचा शहरभर वापर केला, असा आरोप करण्यात आला आहे.

इतकंच नव्हे, तर शेवटच्या पाच दिवसांत नवनीत राणा खुलेआम भाजपच्या विरोधात प्रचार करत होत्या. भाजपचे उमेदवार डमी आहेत, युवा स्वाभिमानीचे उमेदवारच खरे भाजपचे उमेदवार आहेत, असा प्रचार करण्यात आल्याचा दावाही या उमेदवारांनी केला आहे.

आम्ही लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा आणि विधानसभा निवडणुकीत आमदार रवी राणा यांच्यासाठी जीव तोडून काम केलं. पण त्याच नवनीत राणा यांनी आम्हालाच गद्दार ठरवलं आणि सामान्य कार्यकर्त्यांना उद्ध्वस्त केलं, अशी भावनिक प्रतिक्रिया उमेदवारांनी पत्रात व्यक्त केली आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या प्रभावक्षेत्रात प्रचार न करता केवळ भाजपच्या बालेकिल्ल्यांवर लक्ष केंद्रित करून पक्ष कमकुवत करण्याची छुपी रणनीती आखण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

नवनीत राणा यांना पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवला नाही, तर त्या भविष्यात अमरावतीत भाजपचा पूर्णपणे नायनाट करतील. पक्ष वाचवा, ही आमची कळकळीची विनंती आहे, असं म्हणत या उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हस्तक्षेपाची मागणी केली आहे. या पत्रामुळे अमरावतीतील भाजपच्या अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली असून, महापौरपदाच्या चर्चांपेक्षा आता पक्षातील बंडखोरी आणि कारवाईकडेच संपूर्ण शहराचं लक्ष लागलं आहे.

# भाजप नगरसेवक शरद मोरे यांच्यावर जीवघेणा हल्ला; ५० लाखांची मागितली खंडणी



**नाशिक, ता. १८ :** नाशिक शहरातील राजकीय वातावरण तापवणारी धक्कादायक घटना समोर आली असून, भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक शरद मोरे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. निवडणुकीतील पराभवाच्या रागातून काही हल्लेखोरांनी अभिनंदनाच्या बहाण्याने घरासमोर येत थेट मोरे यांच्यावर हल्ला केला. या घटनेत शरद मोरे यांच्यासह त्यांच्या पत्नी गीताही जखमी झाल्या आहेत.

ही घटना शुक्रवारी (१६ जानेवारी) रात्रीच्या सुमारास नाशिकरोड येथील जेलरोड परिसरात घडली. शरद मोरे यांनी भाजपच्या तिकिटावर प्रभाग क्रमांक १८ मधून निवडणूक लढवली होती. त्यांच्या विरोधात शिवसेना (शिंदे गट)चे माजी नगरसेवक पवन पवार यांच्या आई आशा पवार या उमेदवार होत्या. आजारी अवस्थेतही मोरे यांनी प्रचार करत निवडणूक लढवली आणि अल्प मतांनी विजय मिळवला होता. निवडणूक निकालानंतर मोरे हे घराबाहेर असताना काही जण अभिनंदन करण्याच्या नावाखाली तेथे आले. काही क्षणांतच त्यांनी हल्ला चढवत पिस्तुलाचा धाक दाखवून ५० लाख रुपयांची खंडणी मागितली. यावेळी मोरे यांच्या गळ्यातील सोन्याची साखळीही हिसकावून घेण्यात आली. हल्ल्यात मोरे जखमी झाले असून, त्यांना वाचवण्यासाठी पुढे आलेल्या पत्नी गीता यांच्यावरही धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. यात त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे.

घटनेची माहिती मिळताच नाशिकरोड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. या प्रकरणात अनुराग सागवान, यश गरुड, दीपक सदाफळे आणि विजयसिंग या चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच बंटी काळे, किरण गाटोले, शुभम आदमाने, भूर्य खेडकर, प्रशांत सदाफळे, पवन पवार आणि विशाल पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणात खंडणी, खून करण्याचा प्रयत्न आणि दरोडा या गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला असून, निवडणुकीतील पराभवाच्या रागातूनच हा हल्ला करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सूर्यवंशी करत आहेत.

# ...तर आम्ही विरोधात बसायलाही तयार; ठाण्यात भाजप-शिवसेना संघर्ष चव्हाट्यावर

**ठाणे, ता. १८ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील दुसरा टप्पा समजल्या जाणाऱ्या २९ महापालिकांच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत भाजप सर्वच पक्षांना वरचढ ठरला असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मुंबई महापालिकेसह अनेक महापालिकांवर भाजपच्या सर्वाधिक जागा जिंकून आल्या आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपला ८९ तर शिवसेना शिंदे पक्षाला २९ जागा मिळाल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे होमग्राऊंड असलेल्या ठाणे महापालिकेत शिवसेनेने ७५ जागांवर विजय मिळाला आहे. तर भाजपला २८ जागांवर समाधान मानावे लागले आहे. या सगळ्यात आता भाजपकडून



एक मोठा डाव टाकण्यात आल्याची जोरदार चर्चा आहे.

निवडणुकीच्या निकालानंतर भाजपने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भाजप आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांनी पत्रकार परिषद घेत गरज पडली तर आम्ही विरोधात बसायलाही तयार असल्याचे मोठं विधान केले आहे. त्यामुळे ठाणे महापालिका निवडणुकीनंतर भाजप आणि शिवसेना यांच्यातील सुप्त संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. ठाणे महापालिकेत १३१ जागा आहेत. त्यापैकी महायुतीने १०३ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे.

शिवसेना (शिंदे गट) ७५, भाजप-२८, राष्ट्रवादी (शरद पवार गट)-१२, राष्ट्रवादी (अजित पवार गट)-०९, शिवसेना (ठाकरे गट)-०१, इतर पक्षांना ०६ जागा मिळाल्या आहेत. या निवडणुकीत ठाकरे गटाला जबरा फटका बसला आहे. ठाकरे बधूंची येथे जाहीर सभा होऊन देखील पक्षाला केवळ एकाच जागेवर समाधन मानावे लागले आहे. आम्ही ४० जागा लढवल्या आणि २८ जागांवर यश मिळवले. २०१७ च्या तुलनेत आमच्या ५ जागा वाढल्या आहेत. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम आम्ही करू. गरज पडली तर आम्ही विरोधात बसायलाही तयार आहोत.

ठाणे जिल्हा हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला समजला जातो. महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंनी आपलं एकतर्फी वर्चस्व सिद्ध केले आहे. या निवडणुकीसाठी शिवसेनेने भाजपसोबत युती करून निवडणूक लढवली होती. पण आता निकाल लागल्यानंतर भाजपने वेगळी भूमिका घेण्याची तयारी दर्शवल्याने उलट सुलट चर्चांना उधाण आले आहे. महापौरपदाच्या चर्चेसाठी भाजप स्वतःहून पुढाकार घेणार नाही, असेही भाजपकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संघर्ष आणखी तीव्र झाला आहे.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र?

**बारामती, ता. १८ :** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका एकत्र लढण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने घेतला आहे. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट करत सावध भूमिका घेतली.

बारामती येथे कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने दोन्ही राष्ट्रवादीचे नेते बारामतीत आले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गोविंदबाग येथे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेऊन चर्चा केली. या वेळी खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री जयंत पाटील, राजेश टोपे, खासदार



अमोल कोल्हे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, आमदार रोहित पवार आदी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकत्र लढण्याबाबत चर्चा करण्यात आली.


बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका एकत्र लढविण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सावध भूमिका घेतली. ते म्हणाले, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका एकत्र लढण्याबाबतच्या निर्णयाचा अधिकार स्थानिक पदाधिकाऱ्यांना आहे. ते आपापल्या भागातील परिस्थिती पाहून निर्णय घेतील.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकत्र लढण्यावर सकारात्मक संवाद झाला आहे, असे खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढतील. तुल्यबळ उमेदवार असल्यास तेथे मैत्रीपूर्ण लढती होतील, असे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत बलाढ्य शक्तीच्या विरोधात एकत्र लढण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात घेतल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. त्याचा परिणाम निवडणूक निकालांवर झाला. गेल्या अडीच ते तीन वर्षांत विरोधी पक्षात राहून राजकारण केल्यामुळे आणि निवडणुकीच्या अवघ्या दहा दिवस आधी एकत्र येण्याचा निर्णय घेतल्यामुळे अनेक कार्यकर्त्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला. त्यामुळे काही ठिकाणी अपेक्षित यश मिळाले नाही, असे आमदार रोहित पवार म्हणाले.

# जनतेने दिलेला विश्वास आम्ही पूर्ण केला, परिणाम तर भोगावे लागतील ना; वसंत मोरेंची पोस्ट व्हायरल

**पुणे, ता. १८ :** पुणे महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. १६५ प्रभाग रचना असलेल्या पुणे महापालिकेत तब्बल ११९ जागांवर भाजपचे उमेदवारांनी विजय मिळवला आहे. या विजयात केंद्रीय मंत्री भाजप नेते आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले जाते. तर दुसरीकडे इतर पक्षांची अवस्था बिकट बनली असल्याचे चित्र आहे. पुण्यातील राजकारणात वसंत मोरे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतात. महापालिका निवडणुकीत त्यांना पराभवाचा धक्का बसला असून, निकालानंतर वसंत मोरे यांनी सोशल मीडिया अकाऊंवरून पोस्ट शेअर



केली आहे. पुणे महानगरपालिका पोटनिवडणुकीच्या निकालाने कात्रज परिसरातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली आहेत. ठाकरे गटाचे आक्रमक नेते म्हणून वसंत मोरे यांची ओळख आहे. त्यांचा भारतीय जनता पार्टीचे उमेदवार व्यंकोजी खोपडे यांनी ११०० मताधिक्क्यांनी पराभव केला आहे. आता पराभवानंतर वसंत मोरे यांनी त्यांच्या सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमुळे अनेकांच्या भुवया उंचवल्या आहेत.

कात्रजच्या जनतेने त्यांना जमिनीवर आणलं असे पोस्टमध्ये वसंत मोरे म्हणाले आहेत. तसेच परिणाम तर भोगावे लागतील ना असेही त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे या पोस्टमधून मोरे यांनी नेमका कुणाला इशारा दिला आहे. याबाबत तर्क वितर्क लढवले जात आहे. पुणे महापालिका निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले आहे.

चार वर्ष पुणे शहरात कोणतेही पद नसताना २०२२ ते २०२६ गरीब मायबाप जनतेचा आधार बनून होतो आणि आता तर २० हजार ८६७ पीडित, शोषित, प्रमाणिक जनतेने आशीर्वाद दिला आहे. परिणाम तर भोगावे लागतील ना,असे पोस्टमध्ये वसंत मोरे म्हणाले आहेत. या सोबतच त्यांनी एक व्हिडीओ देखील शेअर केला आहे.


दरम्यान, दुसरीकडे वसंत मोरे यांचा मुलगा रुपेश मोरे देखील निवडणुकीच्या रिंगणात उभा होता. भाजप उमेदवार रंजना टिळेकर यांनी प्रभाग क्रमांक ४० (ड) मधून विजय मिळवत रुपेश मोरेला पराभूत केले आहे. या टफ फाईटकडे सगळ्याचे लक्ष होते. मात्र, मतमोजणीच्या दिवशी पहिल्या फेरीपासूनच रुपेश मोरे पिछाडीवर पडल्याने रंजना टिळेकर विजयी झाल्या आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

**प्राईम लाईफ**



## आहारात वेलचीचा समावेश करण्याचे फायदे जाणून तुम्हीही थक्क व्हाल

**पुणे, ता. १८ :** आपल्या स्वयंपाकघरातील अनेक गरम मसाले हे आरोग्यासाठी खूपच उपयुक्त आहेत. परंतु माहितीअभावी मात्र आपण त्यांचा उपयोग करत नाही. पूर्वीच्या काळी गरम मसाल्यांचा उपयोग हा औषधांसाठीही केला जायचा. परंतु सध्याच्या घडीला मात्र माहीत नसल्यामुळे, आपल्याला कोणत्या मसाल्यांचा वापर कशापद्धतीने करता येऊ शकतो हे मात्र आपल्या गावीही नसते.

असाच मसाल्यातील एक महत्त्वाचा मसाला म्हणजे, वेलची. भारतीय स्वयंपाकघरात तुम्हाला वेलची सहज मिळेल. चहामध्ये वापरण्यासोबतच वेलचीचा वापर अनेक भाज्यांमध्ये केला जातो, पण तुम्ही विचार केला आहे का की छोटी वेलची तुम्हाला अनेक आजारांपासून दूर ठेवते. रक्तदाब संतुलित ठेवण्यासाठी हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी देखील वेलची खूप फायदेशीर आहे.

चला तर मग जाणून घेऊया वेलचीचे इतर कोणते फायदे आहेत. वेलचीमध्ये कार्बोहायड्रेट्स, आहारातील फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह आणि फॉस्फरस सारखी खनिजे असतात. अशा परिस्थितीत उच्च रक्तदाब असलेल्यांनी त्यांचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे. वास्तविक, कॅल्शियम, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांसारखी खनिजे रक्तदाब नियंत्रित करण्यात मोठी भूमिका बजावतात. चयापचय गतिमान करण्यासाठी वेलचीचे सेवन देखील खूप फायदेशीर आहे.

रोगप्रतिकार शक्ती मजबूत करण्यासाठी, आपण आपल्या आहारात वेलचीचा समावेश केला पाहिजे. वेलची खाल्ल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो. म्हणजेच ते खाल्ल्याने तुमच्या शरीरात कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहते.

ज्या लोकांना वेळेवर झोप येत नाही किंवा झोप कमी होण्याची समस्या आहे त्यांनी वेलचीचे सेवन जरूर करावे. वेलची माऊथ फ्रेशनर म्हणून काम करते. तुम्ही वेलचीच्या बिया थेट चावून खाऊ शकता. याशिवाय तुम्ही चहामध्ये वेलचीचे सेवन करू शकता. तुम्ही वेलचीचे सेवन कोणत्याही पदार्थात करू शकता. त्यामुळे जेवणाची चवही वाढेल.

# जिल्हा परिषदेसाठी भाजप–शिवसेना एकत्र; अजित पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का

**पुणे, ता. १८ :** पुणे पुणे जिल्हा परिषद निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) एकत्र लढण्याची दाट शक्यता असून, आज दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांमध्ये जागा वाटपाच्या निकषांवर महत्त्वाची बैठक पार पडली. मात्र, या सर्व प्रक्रियेत राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) सोबत न घेण्याचा सूर उमटला.

पुणे जिल्हा परिषदेतही भाजप-शिवसेना एकत्र निवडणुका लढविणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. पुण्यातील या महत्त्वाच्या बैठकीला केंद्रीय मंत्री तथा भाजपचे जिल्हा निवडणूक प्रभारी मुरलीधर मोहोळ,




राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार विजय शिवतारे, भाजपचे नेते राजेश पांडे आणि आमदार राहुल कुल उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या एकूण जागांपैकी कोणत्या जागा कोणाकडे राहतील आणि उमेदवारीचे निकष काय असावेत, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. दोन्ही पक्षांनी आपापल्या ताकदीचा आढावा घेत प्राथमिक आराखडा तयार केल्याचे दिसून येत आहे.भाजपच्या जिल्हा कोअर कमिटीची बैठक पार पडली.

या बैठकीत जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेससोबत (अजित पवार निवडणूक लढवण्यास स्पष्ट विरोध दर्शवल्याची माहिती समोर आली आहे. स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीसोबत असलेले संघर्ष आणि कार्यकर्त्यांची नाराजी लक्षात घेता केवळ शिवसेनेसोबत युती करून पुढे जावे, असा सूर या बैठकीत उमटला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या बैठकीतही भाजप व शिवसेना एकत्रपणे जिल्हा परिषद निवडणुका लढविणार असल्याची शक्यता आहे.

### आढावा बैठक, युतीची चर्चा : राजेश पांडे

पुणे ग्रामीणमधील पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा आढावा घेण्यात आला आणि चर्चा झाली. दुसऱ्या दिवशीही प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यात महायुती करण्याबाबत प्राथमिक चर्चा झाली. पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरणार असून, वर्षानुवर्षे सत्ता असलेल्या लोकांकडून काहीच कामे झाली नाही, ते जनतेपर्यंत पोहाचविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी दिली.


## महापौर निवडीसाठी लागणार किमान १५ दिवस

**पुणे, ता. १८ :** निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांना पालिकेची पायरी चढण्यासाठी आणखी २० ते २२ दिवसांची प्रतिक्षा करावी लागणार आहे. महापौरपदाची आरक्षण सोडत शासनाने काढलेली नसल्याने उमेदवारांना महापौर निवडीनंतरच नगरसेवकपदाचा मान स्विकारता येणार आहे.सरकार येत्या तीन-चार दिवसात आरक्षण सोडत काढणार असून त्यानंतर, मुख्य सभा बोलवणे, निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करणे तसेच निवडणुकीचा कार्यक्रम राबविणे यासाठी १५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. महापौर निवडीची पहिली मुख्यसभा झाल्यानंतरच निवडलेले उमेदवार नगरसेवक होतात. त्यामुळे निवडून आल्यानंतर त्यांना काही काळ थांबावे लागणार आहे.

# मौनी अमावस्येला संगमच्या काठावर गोंधळ; शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा पवित्र स्नानास नकार

**प्रयागराज, ता. १८ :** शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी प्रयागराज माघ मेळ्यात मौनी अमावस्येला स्नान करण्यास नकार दिला आहे. त्यांनी त्यांची पालखी अर्ध्यातूनच आखाड्यात परत आणली. ते त्यांच्या पालखीतून आखाडा सोडून संगमाकडे जात असताना, उत्तर प्रदेश सरकारचे गृह सचिव मोहित गुप्ता यांनी त्यांच्या शिष्यांना मारहाण केली असल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व परिस्थितीमुळे त्याठिकाणी गोंधळ वाढला आणि अविमुक्तेश्वरानंद यांनी स्नान करण्यास नकार दिला.

शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शिष्यांवर हल्ला होत आहे. अधिकारी त्यांना जीवे मारण्याची धमकी देत होते,



म्हणून आपण याठिकाणी स्नान करणार नसल्याचे म्हटले. मौनी अमावस्येला प्रयागराजच्या संगम शहरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिस दल तैनात आहे. रात्रीपासूनच नियंत्रण कक्षापासून संगम नाक्यापर्यंत पोलिस अधिकारी गस्त घालत आहेत.

मौनी अमावस्येला प्रयागराजच्या संगम शहरात भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. मध्यरात्रीपासूनच मौनी अमावस्येच्या पवित्र प्रसंगी स्नान करण्यासाठी भाविक संगमाकडे जात आहेत. संगम नाक्यावर गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिस आणि पीएसी कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. भाविक एकाच ठिकाणी थांबू नयेत म्हणून पोलिस कर्मचारी शिट्ट्या वाजवत आहेत. संगम नाक्यावर स्नान केल्यानंतर लोकांना सतत पुढे हलवले जात आहे.

प्रशासनाने मौनी अमावस्येला ३ कोटींहून अधिक भाविकांच्या आगमनाचा अंदाज लावला आहे. स्नान घाटांवर जल पोलिस, एनडीआरएफ, एसडीआरएफ, फ्लड कंपनी पीएसी आणि गोताखोर तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय, मेळ्यात पोलिस, पीएसी, आरएएफ, बीडीएस, यूपी एटीएस कमांडो आणि गुप्तचर संस्था तैनात आहेत. पोलिस आयुक्तांच्या मते, परिसराच्या प्रत्येक इंचावर देखरेख आहे. संपूर्ण माघ मेळ्यावर सीसीटीव्ही आणि ड्रोन कॅमेरे लक्ष ठेवून आहेत. संशयास्पद व्यक्ती आणि वस्तूंवरही बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

## शिरूरमध्ये २ कोटींच्या एमडी ड्रग्सवर कारवाई; एकास अटक

**योगेश मारणे**

शिरूर, ता. १८ : शिरूर तालुक्यात अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला आळा घालण्यासाठी शिरूर पोलीस स्टेशन आणि स्थानिक गुन्हे शाखा यांच्या संयुक्त पथकाने मोठी कारवाई केली आहे.शिरूर परिसरातील बाबुराव नगर येथे छापा टाकून तब्बल १ किलो ५२ ग्रॅम एमडी (मेफेड्रॉन) जप्त करण्यात आले असून,त्याची आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार किंमत सुमारे २ कोटी १० लाख रुपये आहे.


या कारवाईत शादाब रियाज शेख (वय ४१,रा.शिरूर, ता.शिरूर,जि. पुणे) याला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून एमडीसह दुचाकी, मोबाईल व रोख रक्कम असा एकूण २ कोटी १० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शनिवारी (ता.१७) रात्री पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. शिरूर परिसरातील बाबुरावनगर परिसरात सापळा रचून संशयिताला अडवून झडती घेतली असता,त्याच्याकडील बॅगेत एमडी ड्रग्स आढळून आले.या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यामधील विविध कलमांच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

या कारवाईमुळे शिरूर तालुक्यातील अमली पदार्थ विक्रीच्या रॅकेटचा पर्दाफाश होणार असल्याचे बोलले जात आहे.तसेच अशा प्रकारे अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी. अशीही मागणी नागरिकांकडून होत आहे.

# खंबाटकी घाटात एस वळणाला बायपास; पुणे–सातारा प्रवासाचे अंतर होणार कमी

**पुणे, ता. १८ :** पुणेसातारा महामार्गावरील अपघातप्रवण खंबाटकी घाटातील धोकादायक एस आकाराच्या तीव्र वळणाला अखेर पर्याय मिळाला आहे. तब्बल सहा वर्षांपासून सुरू असलेल्या प्रकल्पातील साताऱ्याकडून पुण्याकडे येणारा एक तीन पदरी बोगदा शनिवारी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. दरी पुलाचे काम अपूर्ण असल्याने सध्या प्रायोगिक तत्त्वावर केवळ हलक्या वाहनांना परवानगी देण्यात आली आहे.

खंबाटकी घाटातील सध्याचा रस्ता तीव्र उतार, अरुंद वळणे आणि दुहेरी लेनमुळे कायम अपघात व कोंडीसाठी ओळखला जात होता. विशेषतः वीकएंड व सुट्ट्यांच्या काळात येथे वाहतूक ठप्प होणे



नित्याचेच होते. ही समस्या कायमची दूर करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (छक्ख) फेब्रुवारी २०१९ मध्ये दोन नव्या बोगद्यांना मान्यता दिली. करोनामुळे काम रखडले असले तरी प्रकल्प सध्या ९० टक्के पूर्ण झाला असून मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या प्रकल्पांतर्गत सुमारे ६.४६ किलोमीटर लांबीचा नवा मार्ग विकसित करण्यात आला आहे. डाव्या बाजूला १३०७ मीटर व उजव्या बाजूला १२२४ मीटर लांबीचे तीन पदरी बोगदे तयार करण्यात आले आहेत. त्यासोबतच डावीकडे ११०४ मीटर आणि उजवीकडे ९३० मीटर लांबीचे व्हायाडक्ट उभारले जात आहेत. पुण्याच्या बाजूला बोगद्यानंतर कॅालपर्यंत दरी पुलाचे काम सुरू असून सुमारे १५ टक्के काम अद्याप बाकी आहे.

या बोगद्यांमुळे खंबाटकी घाट पार करण्यासाठी लागणारा वेळ ४५ मिनिटांवरून थेट १० ते १५ मिनिटांवर येणार आहे. इंधनाची मोठी बचत होणार असून प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होईल. शनिवारी झालेल्या चाचणीवेळी साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सर्व काम पूर्ण झाल्यानंतर जुना घाट रस्ता बंद करण्याचा विचार असून, अपघातांचे माहेरघर ठरलेले खंबाटकी घाटातील एस आकाराचे वळण इतिहासजमा होणार असल्याचे छक्ख अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# उरुळी कांचन येथे भरधाव स्कुटरचा अपघात; पाठीमागे बसलेल्या इसमाचा मृत्यू

**उरुळी कांचन, ता. १८ :** पुणे-सोलापूर महामार्गावर दुचाकी स्लीप होऊन झालेल्या अपघातात पाठीमागे बसलेल्या एका इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. पुणे बाजूकडून सोलापूर बाजूकडे जाताना उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील विश्वा पेट्रोल पंपासमोर शनिवारी (ता. १७) दुपारी पाऊणे एक वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला आहे.

नंदु बहरैची कुमार (वय -५५, सध्या रा.चाळ नं. ३४ ३४, कृष्णा प्रभू हॉस्पीटलचे जवळ, लक्ष्मीनगर, पर्वती, जि.पुणे, रा. बहरैची, हलू आपार मेळपो. गौरा उपाध्याय वस्ती, उत्तर प्रदेश) असे अपघातात मृत्यू झालेल्या इसमाचे नाव आहे. याप्रकरणी आकाश दिनेशकुमार




राणा (वय -२१ वर्श, धंदा- मजुरी, सध्या रा.चाळ नं. ३४३४, कृष्णा प्रभू हॉस्पीटलचे जवळ, लक्ष्मीनगर, पर्वती, जि.पुणे, मूळ रा. रेबारी भास, भाटकडा, ता. जि. सिरोही, राज्य राजस्थान) याच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संतोष लक्ष्मण झोंबाडे (वय ३५, व्यवसाय अँम्ब्युलन्स ड्रायव्हर, रा. झोंबाडेवस्ती, उरुळी कांचन) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आकाश राणा हा त्याच्या ताब्यातील सुझुकी एक्सेस स्कुटर (क्रमांक एम.एच.१२ टी.एल. ६९०८) भरधाव वेगात व वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून चालवत होता. स्कुटरवर मागे बसलेला नंदु बहरैची कुमार हा अचानक जोरात हलल्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि स्कुटर घसरून अपघात झाला. या अपघातात नंदु कुमार यांना डोक्याला व पोटाला गंभीर दुखापती होऊन झाली होती तर अपघातात स्कुटरचेही मोठे नुकसान झाले होते.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच कस्तुरी रुग्णवाहिकेचे संतोष झोंबाडे व रतन चव्हाण यांनी तात्काळ जखमी नंदु बहरैची कुमार याला उरुळी कांचन येथील हिमालया रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी स्कुटर चालकाविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार रमेश भोसले करीत आहेत.

# पुण्यातील व्यापाऱ्याच्या हत्येप्रकरणी आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

**पुणे, ता. १८ :** पुण्यातील व्यापारी लक्ष्मण साधू शिंदे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी अखेर पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. झारखंडच्या रामगड जिल्ह्यातून संटू कुमार ऊर्फ कुंदन या सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात आली असून, त्याच्या अटकेमुळे ऑनलाईन फसवणूक, अपहरण आणि हत्या करणाऱ्या आंतरराज्य गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

गेल्या वर्षी लक्ष्मण शिंदे यांना कोल इंडिया कंपनीच्या नावाने बनावट ई-मेल प्राप्त झाला होता. स्वस्त दरात भंगार (स्क्रॅप) उपलब्ध करून देतो, असे आमिष दाखवण्यात आले होते. या व्यवहारासाठी शिंदे पाटणा येथे गेले. मात्र, ही भेट त्यांच्या आयुष्याची अखेरची ठरली. संटू कुमार आणि त्याच्या साथीदारांनी शिंदे यांचे अपहरण करून त्यांना एटीएम पिन मिळवण्यासाठी अमानुष छळ



केला आणि अखेर त्यांची हत्या केली.

पोलिस तपासात समोर आले की, संटू कुमार झारखंडच्या रामगड जिल्ह्यातील एका भाड्याच्या घरातून हे संपूर्ण रॅकेट चालवत होता. तो स्वतःला बँकेचा एक्झिक्युटिव्ह म्हणून ओळख देत नागरिकांना फोन करायचा. त्यानंतर मोबाईलमध्ये बनावट झघ फाईल डाउनलोड करण्यास भाग पाडून बँकिंगसह सर्व गोपनीय माहिती मिळवली जायची. काही मिनिटांतच मोबाईल बँकिंगद्वारे खात्यातील रक्कम लंपास केली जायची. आरोपीकडून पोलिसांनी महागडे आयफोन, ६ मोबाईल फोन आणि अनेक बनावट सिमकार्ड जप्त केली आहेत. या टोळीने देशातील विविध राज्यांतील नागरिकांना गंडा घातल्याचा संशय असून, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. या प्रकरणामुळे ऑनलाईन व्यवहारातील फसवणुकीचे धक्कादायक वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.

# देशभरात टोलनाक्यावरील रोख रक्कम घेण्याची पद्धत बंद?; पेमेंट दोन पद्धतीद्वारे स्वीकारले जाणार

**पुणे, ता. १८ :** आपल्या राष्ट्रीय महामार्गांवर प्रवास करण्याची पद्धत लवकरच बदलणार आहे. आणखी एक महत्त्वाचा बदल घडत आहे. यापुढे महामार्गांवर टोल भरण्याची पद्धत पूर्णपणे बदलणार आहे. केंद्र सरकार १ एप्रिलपासून राष्ट्रीय महामार्ग टोल प्लाझावर रोख पैसे भरण्यावर बंदी घालण्याची तयारी करत आहे. याचा अर्थ असा की लांब रांगेत वाट पाहणे, रोख रक्कम शोधण्यासाठी संघर्ष करणे आणि टोल बूथवर थांबण्याची सक्ती संपणार आहे.

नवीन प्रणाली अंतर्गत, वाहनचालकांना फक्त फास्ट किंवा णझख द्वारे टोल शुल्क भरावे लागेल, जे डिजिटल प्रवासाच्या दिशेने एक मोठे




पाऊल आहे. या नवीन निर्णयामुळे केवळ पैसे वाचतीलच असे नाही तर प्रवासाचा वेळही कमी होईल आणि प्रवास करणे सोपे होईल, असा सरकारकडून विश्वास आहे

टोल प्लाझांना कॅशलेस करण्याची तयारी आधीच सुरू होती. सध्या, अधिकृत अधिसूचना येण्याची वाट पाहत आहे, त्यानंतर अंमलबजावणी केली जाणार आहे. या निर्णयाचा उद्देश टोल प्लाझावरील वाहतूक कोंडी कमी करणे आहे. डिजिटल पेमेंटमुळे, वाहनांना आता रोख व्यवहारांसाठी थांबावे लागणार नाही किंवा बदलाची वाट पाहावी लागणार नाही. यामुळे टोल पॉइंट्सवर वारंवार ब्रेक मारण्याची आणि वेग वाढवण्याची गरज कमी होऊन इंधनाची बचत होईल. डिजिटल पेमेंट देखील रेकॉर्ड राखतील.

याचे इतर कोणते फायदे आहेत? केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे सचिव व्ही. उमाशंकर म्हणतात की, भारताची डिजिटल अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करत आहे. सुरुवातीला, णझख वापरून टोल भरण्याची सुविधा सुरू करण्यात आली होती, जी चांगलीच पसंत करण्यात आली. आता, सरकारने टोल प्लाझावर रोख पेमेंट पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. १ एप्रिलनंतर, फक्त FSTag किंवा UPI पेमेंटसाठी वैध असेल.

सबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, हा बदल भारताच्या टोल प्रणालीचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. सरकार मल्टी-लेन फ्री फ्लो नावाच्या अडथळा-मुक्त टोलिंग मॉडेलवर काम करत आहे, जिथे वाहने न थांबता सामान्य महामार्ग वेगाने टोल क्षेत्रातून जाऊ शकतात. अहवालात म्हटले आहे की यासाठी, इतर देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाची माहिती घेण्याचे प्रयत्न केले जात आहेत.